# 'आर्थिक विकासासाठी सक्षम कायदे महत्त्वाचे'

**पुणे :** देशाचे आर्थिक यश म्हणजे केवळ संसाधनांची उपलब्धता नव्हे, तर सर्वांसाठी विश्वास, गुंतवणूक व न्यायाचे संरक्षण करणारी उत्तम कायदेव्यवस्थाही आहे. देशाची अर्थव्यवस्था ताठ ठेवण्यासाठी कायदा व न्यायव्यवस्था उत्तम असणे महत्त्वाचे आहे, असे मत एयू कॉर्पोरेट अँड लीगल अॅडव्हायजरी सर्व्हिसेस लि.चे (एयूसीएल) संस्थापक अक्षत खेतान यांनी व्यक्त केले. कंपनीच्या वतीने आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. भारतात परदेशी कायदा कंपन्यांना परवानगी देणेही आवश्यक आहे, असेही खेतान म्हणाले. खेतान म्हणाले, ''उद्योगक्षेत्रातील चुकीच्या पद्धती, नियमांचे अडथळे व आर्थिक विषमता यामुळे व्यावसायिक क्षेत्रातील वातावरण डागाळले जात आहे. त्यामुळे शाश्वत व समावेशक वाढीची जबाबदारी विधी व न्यायसंस्था आणि प्रशासन यांच्यातील सहयोगावर आहे. नादारी आणि दिवाळखोरी कायद्यात बदल, तरुणांच्या व्यावसायिक मानसिकतेला उत्तेजन, इंधन व वीजदेखील वस्तू व सेवा कराच्या कक्षेत आणणे आवश्यक आहे.''